हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'मध्ये 'विज्ञान सप्ताह' साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद महाविद्यालयातील मायक्रोबायोलॉजी विभाग व IQAC विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दि. २४.२.२०२५ ते ०३.०३.२०२५ दरम्यान विज्ञान सप्ताह साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. सप्ताहाची सुरुवात दि. २४.०२.२०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक विभाग प्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटनाने झाली. उद्घाटना वेळी झूलॉजी विभाग प्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सप्ताहात पोस्टर, मॉडेल, मायक्रोटून, स्लोगन, एक्स्टेंपर, आगार आर्ट व फर्मेंटेड फूड अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. विजेत्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सप्ताहाची सांगता बॉटनी विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभाने झाली. सर्व स्पर्धांचे नियोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, विभाग प्रमुख डॉ. टी. सी. गौपाले, रजिस्ट्रार श्री.आर.बी.जोग यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीरित्या नियोजन केले.




Main Edition
Mar 7, 2025 Page No. 3

हॅलो प्रभात

10/03/2025

# बदलणाऱ्या काळातील 'सवलतींचा लाभ' घेऊन महिलांनी अधिक सक्षम व्हावे : डॉ. जुई कुलकर्णी

## विवेकानंद कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात



येथील विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयातील महिला सबलीकरण अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अंतर्गत तक्रार समिती, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला अभ्यासकेंद्र यांच्या वतीने आयोजित 'विकसीत भारत २०४७ : स्त्रियांचे स्थान' या विषयावरील व्याख्यानात डॉ. जुई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी त्या म्हणाल्या, विकसनशील पासून विकसीत भारताचे स्वप्न साकारण्या-साठी प्रत्येकानी आपल्या सर्व भूमिका प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. स्त्री पुरुष समानता निर्माण होण्यासाठी एकमेकांना परस्परपुरक सहकार्य करणे आवश्यक आहे. पारंपारिक रुढीतून बाहेर पडून माणूस म्हणून अस्तित्व टिकवणेसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सध्या अनेक सवलती महिलांसाठी उपलब्ध असून त्याचा लाभ घेऊन महिलांनी अधिक सक्षम व स्वावलंबी व्हावे, असे मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी हया होत्या. अध्यक्षीय मनोगतात त्या म्हणाल्या, स्त्रियांनी स्वत:मधील विविध कौशल्यांचा वापर येणाऱ्या काळाची आव्हाने स्वीकारण्यासाठी करावा व जीवनात यशस्वी होणेसाठी संवेदनशील व सक्षम मानसिकता ठेवली पाहिजे असे मत जोशी यांनी मांडले.

या कार्यक्रमासाठी डॉ. उर्मिला खोत, डॉ. कविता तिवडे व रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे बहुमोल सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. वर्षा शिंदे यांनी केले. आभार डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी मानले सूत्रसंचालन प्रा. अश्विनी खवळे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

10/03/2025